● शनिवार, दि २१ सप्टेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ६० वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ | 8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886

जनेस्नहृता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

# अक्षय गोरंट्याल यांची 'अचानक' ग्रॅण्ड लाँचिंग!

## मान्यवरांनी उधळली स्तुतीसुमने; भावी मतदारांची उपस्थिती लक्षणीय...



(एडिटेड फोटो)

**दीपक शेळके**

**जालना -** शहरातील डॉ. फ्रेजर बॉईज शाळेच्या प्रांगणात भरविण्यात आलेल्या राज्यस्तरीय कृषी महोत्सव २०२४ च्या निमित्ताने गोरंट्याल परिवाराकडुन अक्षय गोरंट्याल यांचे अचानकपणे राजकीय लाँचिंग करण्यात आले. प्रसंगी उपस्थित असलेल्या मान्यवरांनी आपल्या भाषणात अक्षय गोरंट्याल नावाचा उदो उदो करत स्तुतीसुमने उधळली. महत्त्वाचे म्हणजे महाविद्यालयीन तसेच विद्यालयीन मुला-मुलींची म्हणजेच भावी मतदारांची उपस्थिती लक्षणीय असल्याने भविष्यातील निवडणुकीत अक्षय गोरंट्याल यांच्याकडे जालन्यातील विधानसभा अथवा महापौर अशी मोठी जबाबदारी देण्याच्या दृष्टिने कृषि महोत्सवाच्या माध्यमातून अक्षय गोरंट्याल यांची 'अचानक' ग्रॅण्ड लाँचिंग करण्यात आली असेच म्हणावे लागेल.

सुरुवातीला सुत्रसंचालकांनी या महोत्सवाची कल्पना ही अक्षय गोरंट्याल यांची असल्याचे वेळोवेळी ठासून सांगितले. त्यानंतर अक्षय गोरंट्याल यांनी प्रास्ताविक करतांना हिंदी-मराठी-इंग्रजी तिन्ही भाषांचा वापर करत शेतकऱ्यांबद्दलची आपली भूमिका विषद केली. यात महत्त्वाचे म्हणजे अक्षय गोरंट्याल यांनी कोणताही कागद किंवा स्क्रीप्ट वाचून दाखविली नाही हे विशेष. शेतकऱ्यांचे खांदे मजबूत करावे लागतील. देशात ६0 टक्के शेतकरी आहेत, देशाची अर्थव्यवस्था शेतीवर आधारित आहे. उत्पादनावर प्रायमरी आणि सेकन्डरी प्रोसेसिंग मुळे कशा प्रकारे उत्पादनात वाढ होते हे देखील सउदाहरण सांगितले. मोसंबीचा भाव वाढला पाहिजे. मोसंबीला जीआय नामांकन प्राप्त आहे. जालना स्टील सिटी अगोदर सीडस् सीटी असल्याचेही अक्षय गोरंट्याल यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगून खा डॉ. कल्याण काळे यांना उद्देशून इतर राज्याप्रमाणे शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्रात कोल्ड स्टोरेज आणि वसतिगृहासाठी केंद्रात पाठपुरावा करण्याची मागणी केली. एकंदरीत अक्षय गोरंट्याल यांनी त्यांच्या प्रगल्भतेचे दर्शन त्यांच्या प्रास्ताविकातून दिले हे ही तितकेच खरे.

भाषणासाठी उभा ठाकलेल्या प्रत्येक मान्यवरांनी अक्षय गोरंट्याल यांचा उदो उदो करण्यात अधिक धन्यता मानली. शेतकऱ्यांसाठी असलेल्या या कृषि महोत्सवात उदघाटनीय कार्यक्रमात उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतांना रितेश मिश्रा यांनी अक्षय गोरंट्याल यांनी मांडलेल्या प्रोसेसिंग युनिटची कल्पना चांगली असून आपण सर्व मिळून त्यासाठी प्रयत्न करु व युनिट आणू, पाणी वाचवण्यासाठी ठिबक वापऱ्यावर भर देण्याचा सल्ला त्यांनी शेतकऱ्यांना दिला. आपल्या भागात सफरचंद, ब्लॅकबेरी, स्टॉबेरी सारखी उत्पादने कशी मिळवता येतील यावर रिसर्च सुरु असून आगामी वर्ष-दोन वर्षात आपल्या भागातील शेतकरीही अशी पिके घेतील असा आशावादही त्यांनी व्यक्त करत शेतकऱ्यांनी जोडधंद्यावर भर देण्याचे आवाहनही केले.

नवनिर्वाचित खासदार डॉ. कल्याण काळे यांनीही अक्षय गोरंट्याल यांच्यावर स्तुतीसुमने उधळली. कैलास गोरंट्याल यांची नव्हे तर त्यांच्या मुलाची अक्षय गोरंट्याल यांची स्तुती करण्याची गरज असल्याचे सांगतांना त्यांनी अक्षय यांनी केलेल्या प्रास्ताविकाचा आधार सांगितला. कमी शब्दात, योग्य मार्गदर्शन, शेती विषयीची माहिती, शेतकऱ्यांविषयीचा कळवळा, अक्षय गोरंट्याल यांच्या प्रास्ताविकात दिसून आल्याचे डॉ. काळे म्हणाले. तर अक्षय गोरंट्याल यांची मराठी भाषा फार चांगली असल्याचे डॉ. काळे यांनी म्हटंले. प्रास्ताविका दरम्यान अक्षय गोरंट्याल यांनी हिंदी-मराठी-इंग्रजी भाषेचा वापर केला होता कदाचीत यामुळेच मराठी भाषाचे ज्ञान घेण्याचा अथवा प्रभुत्व मिळविण्याचा सल्ला डॉ. काळे यांनी दिला असावा.

विजय अण्णा बोराडे यांनी तर अक्षय गोरंट्याल यांना कृषि सम्राटच घोषित करुन टाकले. कृषि महोत्सवाची ही अफलातून संकल्पना आहे. कैलास गोरंट्याल जलसम्राट आहे तर अक्षय गोरंट्याल हा कृषि सम्राट असल्याचे श्री बोराडे म्हणाले. अक्षयला प्रास्ताविक करायला सांगितल्यावर वाटलं होतं हा काय प्रास्ताविक करणार त्यामुळे मी स्वतः खाली मान घालून बसलो मात्र, अक्षय ऐकल्यावर समजले. कागद न घेता तो बोलतोय. अक्षय ची एन्ट्री जबरदस्त झाली असल्याचेही श्री बोराडे यांनी यावेळी म्हटले.

या कार्यक्रमाचे उदघाटक महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले, कार्यक्रमाचे अध्यक्ष विरोधी पक्षनेता विजय वड्डेटीवार यांच्यासह अनेक मान्यवरांनी कार्यक्रमाकडे पाठ फिरविल्याची चित्र दिसून आले. तसे सुत्रसंचलकाने महत्त्वाचे बैठक असल्याचे कारण उपस्थितांना सांगितले. असे असले तरी बॅनरवरील प्रमुख पाहुण्यांपैकी असलेली उपस्थिती सर्व काही दर्शविते. मुळात बॅनरवर आमदार कैलास गोरंट्याल यांच्या संकल्पनेतून उल्लेख असतांना अचानकपणे अक्षय गोरंट्याल यांना स्थान देण्यात आले आणि मान्यवरांनी अक्षय गोरंट्याल यांच्या उदो-उदो करत त्यांची राजकीय ग्रॅण्ड लाँचिंग केली असल्याचे दिसून आले.





राज्यस्तरीय जालना कृषि महोत्सव २०२४ चे उदघाटन दुपारी २ वाजेदरम्यान झाले. यावेळी ब्रदीनारायण बारवाले महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थीनी बरोबरच महाराष्ट्र हायस्कुल, श्री एम.एस जैन विद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थीनीची व कोचिंग क्लासेस मधील मुला-मुलींची उपस्थिती लक्षणीय होती. हे देशाचे भविष्य असून भावी मतदार देखील आहेत कदाचित यामुळेच यांना या भव्य-दिव्य सोहळ्यास आयोजकांनी आमंत्रित केले असावे.




## नाव खराब होतयं...

**आमदार कैलास गोरंट्याल यांच्या संकल्पनेतून जालना कृषि महोत्सव २०२४ चे डॉ. फ्रेजर बॉईज मैदान येथे दिनांक २० ते २३ सप्टेंबर २०२४ दरम्यान आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमानिमित्ताने उभारण्यात आलेल्या भव्य मंडपाच्या आगमनाच्या ठिकाणी आ. कैलास गोरंट्याल यांचे भले मोठे कटाऊट लावण्यात आले आहे. या कटाऊटमध्ये आ. गोरंट्याल हे त्यांच्या नावालाच पायदळी तुडवत असल्याचे भासते. एकंदरीत कार्यक्रमाला झालेला उशिर, मान्यवरांची अनुउपस्थिती आणि महत्त्वाचे म्हणजे अक्षय गोरंट्याल यांना संकल्पनेसाठी दिलेले श्रेय आणि त्यांचा झालेला उदो-उदो यामुळे कादचित वैतागून आ. कैलास गोरंट्याल यांना आपले नाव खराब होतयं असच काहीस वाटले असावे का?**

# प्रतिबंधित घटक असलेल्या औषधांची विक्री प्रकरणात मध्यप्रदेशातून एक ताब्यात

## मुख्य पुरवठादारापर्यंत पोहचण्याचा पोलीसांचा प्रयत्न

**जालना । प्रतिनिधी -** शहरात प्रतिबंधित घटक असलेल्या तसेच अवैधरित्या गर्भपात, कामवासा उत्तेजित करणाऱ्या गोळ्यांचा साठा दिनांक ६ सप्टेंबर रोजी पोलीसांनी जप्त केला होता. या औषधी विक्रीची धागेदारे मध्यप्रदेशापर्यंत पोहचले असून या ठिकाणाहून जालना पोलीसांनी एकास ताब्यात घेतले आहे. यापुर्वी पोलीसांनी आतापर्यंत सहा जणांना ताब्यात घेतले होते. त्यांच्याकडुन प्रतिबंधति घटक असलेल्या औषधांचा जवळपास आठ लाखांपेक्षा अधिकच्या रकमेचा साठा जप्त करण्यात आला होता.



यासंदर्भात अधिक माहिती अशी की, जालना शहरात प्रतिबंधित घटक असलेल्या व अवैधरित्या गर्भपात व कामवासना उत्तेजीत करणाऱ्या औषधाचा साठा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जप्त केला होता. यात अल्तमश शेख, संतोष जाधव, राहुल गायकवाड, उद्धव पटारे यांच्या ताब्यातून आठ लाख ११ हजार २८८ रुपयांचा पान २ वर

# संपादकीय

## द किंग ऑफ स्टॅण्ड अप कॉमेडी; राजू श्रीवास्तव

प्रसिद्ध स्टॅण्ड अप कॉमेडियन राजू श्रीवास्तव यांचा आज २१ सप्टेंबर रोजी दुसरा स्मृतिदिन. दोन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी त्यांची प्राणज्योत मालवली होती. त्यांच्या अकाली निधनाने मनोरंजन विश्वावर शोककळा पसरली होती. द किंग ऑफ स्टॅण्ड अप कॉमेडी अशी ओळख असलेल्या राजू श्रीवास्तव यांचा २५ डिसेंबर १९५३ रोजी उत्तरप्रदेश मधील कानपुर येथे जन्म झाला. राजू श्रीवास्तव यांचे वडील कवी होते. बलई काका नावाने त्यांच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या होत्या. राजू श्रीवास्तव लहान असताना आपल्या वडिलांच्या कविता म्हणत. शालेय वयातच त्यांना नकला करण्याचा छंद लागला. शाळेतील शिक्षकांच्या व गावातील माणसांच्या ते हुबेहूब नकला करत. पुढे ते अमिताभ बच्चन यांची नक्कल करू लागले. अमिताभ बच्चन यांचा हुबेहूब आवाज काढून त्यांनी केलेली नक्कल लोकांना इतकी आवडली की लोक त्यांना ज्युनिअर अमिताभ म्हणू लागले. अमिताभ बच्चन यांच्याप्रमाणेच त्यांनी चित्रपट सृष्टीतील इतर कलाकारांची देखील नक्कल करण्यास सुरुवात केली. त्यांचा हा नकलाचा कार्यक्रम प्रेक्षकांना आवडू लागला. कानपूरमधील प्रेक्षक त्यांना कॉमेडीसाठी बोलवू लागले. त्यांचे कार्यक्रम लोकप्रिय होऊ लागले तेंव्हा त्यांच्या एका मित्राने त्यांना त्यांच्या कॉमेडीची सीडी बनवून विकण्याचा सल्ला दिला. मित्राने दिलेला हा सल्ला त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरला. राजू श्रीवास्तव यांनी त्यांच्या कॉमेडीची सीडी मार्केटमध्ये आणल्यानंतर त्यांच्या सिडीला प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळाला. मुंबईतही त्यांच्या सीडी विकल्या जाऊ लागल्या. मुंबईतही त्यांना खूप प्रसिद्धी मिळाली त्यामुळे ते मुंबईत आले आणि चित्रपटांसाठी ऑडिशन देऊ लागले. तेजाब आणि मैने प्यार किया या चित्रपटात त्यांना छोट्या भूमिका मिळाल्या. त्यांनतर बाजीगर, मिस्टर आझाद या चित्रपटातही त्यांनी भुमीका केल्या मात्र या भूमिकांनी त्यांना समाधान दिले नाही त्यामुळे ते टीव्हीकडे वळले. देख भाई देख या विनोदी मालिकेत त्यांना काम करण्याची संधी मिळाली. त्यानंतर त्यांनी शक्तिमान या मालिकेत काम केले. चित्रपट आणि टीव्हीवर काम करताना त्यांनी त्यांची स्टॅण्ड अप कॉमेडी काही सोडली नव्हती ते स्टॅण्ड अप कॉमेडी करतच होते. २००५ साली टीव्हीवर द ग्रेट इंडियन लाफटर चॅलेंज नावाचा कॉमेडी शो आला होता. या शो मध्ये त्यांनी भाग घेतला. या शो ने त्यांना स्टार बनवले. या शो मध्ये त्यांनी सादर केलेले गजोधर काका, पिंकी पार्लरवाली ही पात्रे खूप लोकप्रिय झाली. या शो नंतर त्यांचे देशभर नाव झाले. त्यांना अनेक कार्यक्रमांमध्ये बोलावले जायचे. या काळात त्यांची कॉमेडी किंग अशीच इमेज झाली होती. २००९ साली त्यांनी बिग बॉस शो मध्येही भाग घेतला होता. २००५ ते २०१० हा त्यांचा सुवर्णकाळ होता. या काळात त्यांची लोकप्रियता गगनाला भिडली होती. त्याचा लाभ घेऊन राजकारणात उतरण्याचा त्यांनी निर्णय घेतला मात्र त्यांना राजकारण मानवले नाही त्यामुळे ते पुन्हा कॉमेडीकडे वळले. त्यांनी आपली स्टॅण्ड अप कॉमेडी पुन्हा सुरू केली. आपल्या स्टॅण्ड अप कॉमेडीने त्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. राजू श्रीवास्तव यांच्याप्रमाणे अनेकांनी स्टॅण्ड अप कॉमेडी करण्याचा प्रयत्न केला पण राजू श्रीवास्तव यांच्या सारखी नक्कल आणि स्टँड अप कॉमेडी कोणालाही जमू शकली नाही. चित्रपट, टीव्ही आणि स्टेज शो मधून प्रेक्षकांना खळखळून हसवणारे राजू श्रीवास्तव यांचे असे अकाली जाणे प्रेक्षकांना चटका लावून जाणारे ठरले. स्टॅण्ड अप कॉमेडीचे किंग राजू श्रीवास्तव यांना दुसऱ्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

पान १ वरुन

## प्रतिबंधित घटक ...

औषधी साठा जप्त करुन सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येऊन तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला होता. ताब्यात घेतलेल्या आरोपींची चौकशीत पोलीसांना अकोला येथील सागर गुणवंतराव आठवले यांच्यामार्फत या औषधीचा साठा मागविल्याचे कळाले यावर पोलीसांनी अकोला येथून सागर आठवले यास ताब्यात घेतले होते. सागर आठवले यांच्या पीसीआर दरम्यान केलेल्या चौकशीत अमरावती येथील कपिल किसनलाल साहू याच्या संदर्भात पोलीसांना माहिती मिळाली. अमरावतीतून पोलीसांनी कपिल साहु यास ताब्यात घेतले त्याच्या कडे प्रतिबंधित घटक असलेल्या ८७ हजारांच्या औषधाचा साठा जप्त करण्यात आला. कपिल साहु याची कसुन चौकशी केल्यानंतर या औषधांचे धागेदोरे मध्यप्रदेशात असल्याचे उघड झाले. त्यानंतर पोलीसांनी कृष्णा युवराज पहाडे (वय ३८ वर्ष रा. उमरीया ता. आमला जि. बैतुल, मध्यप्रदेश) यास मध्यप्रदेश येथून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दिनांक १५ सप्टेंबर रोजी ताब्यात घेतले.

या गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्या आरोपी कृष्णा पहाडे याची सध्या पोलीस कसून चौकशी करत आहे. आतापर्यंतच्या तपासात इतर राज्यातील काही आरोपी निष्पन्न झाले असून या प्रतिबंधित औषधांची व्रिकी करणाऱ्या मुख्य पुरवठादारापर्यंत पोहचून आरोग्यास हानीकारक असलेल्या या औषधांच्या जाळ्याचे समुळ उच्चाटन करण्याचा पोलीसांचा प्रयत्न असल्याचे माहिती शुक्रवार ( दि २०) रोजी दुपारी पोलीस प्रशासनाच्यावतीने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश उबाळे, पोउपनि राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार रुस्तुम जैवाळ, सागर बाविस्कर, कैलास खाडे, जगदीश बावणे, सतीश श्रीनिवास, हरशाद पटेल, किशोर पुंगळे यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखा जालनाच्यावतीने करण्यात आली.

# विहिरी, शेततळे, वीज जोडणीसाठी भरीव अनुदान : बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेच्या निकषांमध्ये सुधारणा

बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेचे निकष सुधारून विहिरी, शेततळे, वीज जोडणी आदींसाठी भरीव अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.सुधारित निर्णयानुसार नवीन सिंचन विहिरीस ४ लाखांपर्यंत तर जुन्या विहिरींच्या दुरुस्तीस १ लाखांपर्यंत अनुदान देण्यात येईल. पूर्वी हे अनुदान अनुक्रमे अडीच लाख आणि पन्नास हजार एवढे होते. इनवेल बोअरिंगसाठी आता ४० हजार तसेच यंत्रसामुग्रीसाठी ५० हजार रुपये आणि परसबागेकरिता ५ हजार देण्यात येईल. नवीन विहिरींबाबत १२ मीटर खोलींची अट रद्द करण्यात आली आहे. तसेच दोन सिंचन विहिरींमधील ५०० फूट अंतराची अट सुद्धा रद्द करण्यात आली आहे. शेततळ्याच्या प्लॅस्टिक अस्तरीकरणासाठी सध्या १ लाख रुपये अनुदान देण्यात येते आता ते प्रत्यक्ष खर्चाच्या ९० टक्के किंवा २ लाख यापैकी जे कमी असेल ते देण्यात येईल. त्याच प्रमाणे तुषार सिंचनासाठी सध्या २५ हजार रुपये देण्यात येतात. आता तुषार सिंचन संच ४७ हजार रुपये किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९० टक्के अनुदानापैकी जे कमी असे ते अनुदान देण्यात येईल. अशाच प्रमाणे ठिबक सिंचन संचासाठी ९७ हजार किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९० टक्क्यांपैकी जे कमी असेल ते अनुदान देण्यात येईल.

याशिवाय इतरही अनेक निकषांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या आहेत. बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) या योजनेंतर्गत घटकांचे आर्थिक मापदंड वाढविणे, निकषांमध्ये सुधारणा व नवीन घटकांचा समावेश करण्यात आला आहे

या योजनेंतर्गत पुढीलप्रमाणे अनुदानात वाढ व निकषांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

**शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण**

प्रचलित आर्थिक मापदंड व शेततळ्याचे आकारमानानुसार परिगणित होणाऱ्या रकमेच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% किंवा रू.२ लाख यापैकी जे कमी असेल ते.इनवेल बोअरिंगसाठी ४० हजार रुपये,वीज जोडणी आकारासाठी २०,००० किंवा प्रत्यक्ष भरलेला आकार यापैकी जे कमी असेल ते .विद्युत पंपसंच/ डिझेल इंजिनसाठी १० अश्वशक्ती क्षमतेपर्यंत पंपसंचकरिता प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या ९०% किंवा रू. ४०,००० यापैकी जे कमी असेल ते. सोलार पंप (वीज जोडणी आकार व पंपसंच ऐवजी) प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% किंवा रू. ५०,००० यापैकी जे कमी असेल ते. एचडीपीई/ पीव्हीसी पाईपसाठी प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या १००% किंवा रू. ५०,००० यापैकी जे कमी असेल ते .

**सूक्ष्म सिंचन संच मध्ये तुषार सिंचन संचासाठी**

प्रचलित आर्थिक मापदंडान्वये तुषार सिंचन संच-रू.४७,०००/- किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% अनुदान यापैकी जे कमी असेल ते.

ठिबक सिंचन संचासाठी प्रचलित आर्थिक मापदंडान्वये ठिबक सिंचन संच-रू.९७,०००/- किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% अनुदान यापैकी जे कमी असेल ते.तुषार सिंचन संच पुरक अनुदान प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत (१) अल्प /अत्यल्प भूधारकांसाठी ५५% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून २५% + बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेतून १०% तसेच (२) बहू भूधारकांसाठी ४५% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून ३०% + बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेतून १५% किंवा रू. ४७,०००/- यापैकी जे कमी असेल ते.

ठिबक सिंचन संच पुरक अनुदान प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत (१) अल्प /अत्यल्प भूधारकांसाठी ५५% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून २५% + बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेतून १०% तसेच (२) बहू भूधारकांसाठी ४५% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून ३०% + बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेतून १५% किंवा रू. ९७,०००/- यापैकी जे कमी असेल ते.यंत्रसामुग्री (बैलचलित/ ट्रॅक्टर चलित अवजारे) (नवीन बाब) साठी ५० हजार रुपये. परसबागेसाठी पाच हजार रुपये.

त्याचप्रमाणे या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.या योजनेच्या लाभार्थ्यांसाठी लागू असलेली रु.१,५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादेची अट रद्द करण्यात आली आहे.या योजनेंतर्गत यंत्रसामग्री (बैलचलित / ट्रॅक्टरचलित अवजारे) ही नवीन बाब समाविष्ट करण्यात आली आहे.नवीन विहीरीबाबत रू. ४ लाख अनुदान मर्यादेपर्यंत विहीरीची खोली असावी, १२ मीटर खोलीची अट रद्द करण्यात आली आहे.महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्यासाठी विनियमन) अधिनियम १९९३ च्या कलम ३ नुसार अस्तित्वातील पेयजल स्त्रोताच्या ५०० मीटर परिसरात नवीन विहिर घेण्यास प्रतिबंध घालण्यात आलेले आहेत. त्यामुळे अस्तित्वातील पेयजल स्त्रोताच्या ५०० मीटर परिसरात सिंचन विहिर अनुज्ञेय करु नये, यास मान्यता देण्यात आली आहे. ही योजना अनुसूचित जमातीच्या लाभ धारकांसाठीच राबविण्यात येत असल्याने, दोन सिंचन विहिरींमधील ५०० फूट अंतराची अट रद्द करण्यात आली आहे.

नवीन विहीर या घटकाचा लाभ घेतलेल्या लाभार्थीस २० वर्षानंतर जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ देण्यात यावा. शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण या घटकासाठी प्रचलित आर्थिक मापदंड व शेततळ्याचे आकारमानानुसार परिगणित होणाऱ्या रकमेच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% किंवा रू.२ लाख यापैकी जे कमी असेल ते अनुदान देण्याची तरतूद करावी. शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण या घटकाचा लाभ मागेल त्याला शेततळे या योजनेबरोबरच इतर योजनेंतर्गत शेततळ्याचा लाभ घेण्यात आलेल्या तसेच स्वखर्चाने शेततळे केलेल्या शेतकऱ्यांना देखील देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत लाभार्थ्यास नवीन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती किंवा शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण यापैकी एकाच घटकाचा व त्यासोबतच्या पॅकेजचा लाभ देय राहील.

अ) नवीन विहीर या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास नवीन विहीर, इनवेल बोअरिंग, वीज जोडणी आकार, विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन, सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी), एचडीपीई/ पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, यंत्रसामुग्री, परसबाग या घटकांसह एकूण रु. ६,४२,०००/ किंवा रु. ६,९२,००० एवढ्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. (विहीर- रु.४,००,०००+ इनवेल बोअरिंग-रु.४०,००० + वीज जोडणी आकार-रु.२०,००० + विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन- रु. ४०,००० किंवा सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी)- रु.५०,००० + एचडीपीई/ पीव्हीसी पाईप- रु. ५०,००० + तुषार सिंचन संच रु. ४७,०००/ ठिबक सिंचन संच रु. ९७,००० + यंत्रसामुग्री- रु.५०,०००+ परसबाग रु.५,००० = रु. ६,४२,०००/किंवा रु. ६,९२,०००)

आ)जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास जूनी विहीर दुरुस्ती, इनवेल बोअरिंग, वीज जोडणी आकार, विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन, सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी), एचडीपीई/पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, यंत्रसामुग्री, परसबाग या घटकांसह एकूण रु ३,४२,०००/ किंवा रु ३,९२,००० एवढ्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. (जूनी विहीर दुरुस्ती- रु.१,००,०००+ इनवेल बोअरिंग-रु.४०,००० + वीज जोडणी आकार-रु.२०,००० + विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन- रु. ४०,००० किंवा सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी)- रु.५०,००० + एचडीपीई/ पीव्हीसी पाईप- रु. ५०,००० + तुषार सिंचन संच रु. ४७,०००/ ठिबक सिंचन संच रु. ९७,००० + यंत्रसामुग्री- रु.५०,०००+ परसबाग रु.५,००० = रु. ३,४२,०००/किंवा रु. ३,९२,०००)


इ) शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण, वीज जोडणी आकार, विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन, सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी), एचडीपीई/पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, यंत्रसामुग्री, परसबाग या घटकांसह एकूण रु. ४,०२,०००/किंवा रु. ४,५२,००० एवढ्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. (शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण - रु.२,००,००० + वीज जोडणी आकार-रु.२०,००० + विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन- रु. ४०,००० किंवा सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी)- रु.५०,००० + एचडीपीई/ पीव्हीसी पाईप- रु. ५०,००० + तुषार सिंचन संच रु. ४७,०००/ ठिबक सिंचन संच रु. ९७,००० + यंत्रसामुग्री- रु.५०,०००+ परसबाग रु.५,००० = रु. ४,०२,०००/किंवा रु. ४,५२,०००).

# पर्यावरण संरक्षण, शाश्वत विकासामध्ये महाराष्ट्र अग्रेसर

जागतिक तापमानवाढीचे युग संपून आता होरपळीचे युग सुरू झाले आहे. त्यामुळे आता त्वरीत कार्यवाही करणे आणि निर्णय घेण्याची वेळ आल्याचे आवाहन संयुक्त राष्ट्र संघटनेने केले आहे. सध्या वातावरणामध्ये होत असलेल्या बदलांचा विचार करता खरोखरच त्वरीत कार्यवाहीची गरज निर्माण झाल्याचे दिसते आहे. संयुक्त राष्ट्रांनी केलेल्या या आवाहनाला तातडीने प्रतिसाद दिला तो भारताने. भारतात याविषयी त्वरीत कार्यवाहीची सुरुवात केली ती महाराष्ट्र शासनाने. त्यामुळेच यंदाच्या उन्हाळ्यात युरोप आणि अमेरीकेतील राष्ट्रांमध्ये जी होरपळ दिसून आली तशी परिस्थिती आपल्याकडे फारच थोड्या प्रमाणात दिसून आली.

होरपळ कमी करण्यात महाराष्ट्राला आलेले यश महत्त्वाचे तर आहेच. पण सर्वात महत्त्वाचे आहे ते महाराष्ट्र शासनाने भविष्यातील हा धोका ओळखून उचलेली तातडीची पावले. त्यामुळेच तापमानवाढ कमी होण्यास मदत होतच आहे. त्याबरोबरच अवेळी होणारा पाऊस, कमी कालावधीत जास्तीचा पाऊस या सारख्या घटना यंदाच्या मौसमात कमी घडल्या आहेत. वातावरणात होत असलेल्या बदलाच्या अनुषंगाने भविष्याचा विचार करून राज्य शासनाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात घेतलेले पर्यावरण विषयक अनेक महत्त्वाचे निर्णय यामुळे हे शक्य झाले आहे. या निर्णयांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यात मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली 'मुख्यमंत्री पर्यावरण व शाश्वत विकास कृती समिती'चीही स्थापना करण्यात आली आहे. तर राज्य कृषीमूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल हे या समितीच्या कार्यकारी अध्यक्षस्थानी आहेत.

महाराष्ट्र शासन पर्यावरण संरक्षणासाठी व शाश्वत विकासासाठी करत असलेल्या या कार्याची दखल थेट आंतरराष्ट्रीय पातळीवरून घेण्यात आली आहे. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी पर्यावरण संरक्षणासाठी घेतलेल्या निर्णयांची दखल घेत आंतरराष्ट्रीय कृषी परिषदेने दुसरा जागतिक कृषी पुरस्कार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केला आहे. येत्या १८ तारखेला मुंबईतील एनसीपीए येथे होणाऱ्या सोहळ्यामध्ये २० देशांच्या प्रतिनिधींच्या साक्षीने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री श्री. शिंदे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. हा पुरस्कार म्हणजे महाराष्ट्रातील तमाम जनतेचाच सत्कार असून सर्व महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची बाब आहे.



पर्यावरणात होत असलेल्या बदलास मुख्यतः कारणीभूत आहे ते म्हणजे होणारे कार्बन उत्सर्जन. देशातील कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी केंद्र सरकारने औष्णिक विद्युत प्रकल्पांमध्ये ५ टक्के जैविक इंधन वापरणे बंधनकारक केले आहे. हे जैविक इंधन कोळशाला पर्याय ठरणारे असले पाहिजे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. याचा विचार करून महाराष्ट्र शासनाने राज्यात बांबू लागवडीचा कार्यक्रम हाती घेतला आहे. बांबू हे एक वैशिष्ट्यपूर्ण गवतवर्गीय पीक आहे. याचे महत्त्व ओळखून राज्यात ११ लाख ४६ हजार हेक्टरवर बांबू लावगडीचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच याला प्रोत्साहन मिळण्याच्या दृष्टीने बांबू लावगडीसाठी ७ लाख रुपये हेक्टरी इतके अनुदान देण्याची योजनाही शासन राबवत आहे. मिशन बांबू लागवड अंतर्गत वन विभाग, रोजगार हमी योजना, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या माध्यमातून बांबूची लागवड केली जात आहे. बांबूचे महत्त्व ओळखून सन २०२१ मध्ये केंद्र सरकारने वन क्षेत्रातील बांबू तोडण्यावरील बंदी उठवली असून आता बांबू हे गवत असल्याची नवी व्याख्या केली आहे. त्यामुळे बांबूची लावगड आणि बांबूपासून आर्थिक उत्पन्न या दोन्ही गोष्टी शक्य झाल्या आहेत.

बांबू या पिकाचे वैशिष्ट्य असे की, बांबू मोठ्या प्रमाणावर कार्बनचे शोषण करतो आणि २०० पट जास्त ऑक्सिजनची निर्मिती करतो. त्यामुळे निसर्गाचे चक्र संतुलित राखण्यामध्ये बांबूचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. याचा विचार करूनच राज्यात बांबू लागवडीचे मिशन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाले आहे. त्यामुळेच महाराष्ट्राचा काही भाग वगळता यंदाच्या उन्हाळ्यात तापमान ५० अंश सेल्सिअसच्या आत राखणे शक्य झाले. याशिवाय हरित हायड्रोजन, हरित अमोनिया, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा क्षेत्रात ७५ कोटी गुंतवणूक, ७५ तलावांचे अमृत तलाव म्हणून संवर्धन, जायकवाडी येथील नाथसागर जलाशयामध्ये तरंगत्या सौर ऊर्जा प्रकल्पाची उभारणी, अमृत वने असे अनेक पर्यावरणस्नेही निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतले आहेत.

तसेच बांबू हे पीक कमी पाण्यात जास्त उत्पादन देते. त्यामुळे शेतकऱ्यांनाही त्याचा फायदा होतो. तसेच पर्यावरणस्नेही असण्याबरोबरच रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून बांबू लागवडीतून शेतकऱ्यांना उदरनिर्वाहाचे साधन निर्माण करण्यात येत आहे.

**हेमंतकुमार चव्हाण, विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई**

## मातंग समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी शासन सकारात्मक - मंत्री देसाई

**मुंबई -** सकल मातंग समाजाच्या अनेक मागण्या आहेत. यापैकी बऱ्याचशा मागण्या शासनाने पूर्णत्वास नेल्या आहेत. समाजाच्या उर्वरित मागण्या पूर्ण करण्याची कार्यवाही सुरू आहे. सकल मातंग समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी शासन सकारात्मक आहे, असे राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई यांनी आज सांगितले.

सकल मातंग समाजाच्या विविध प्रश्नांबाबत मंत्रालयातील समिती कक्षामध्ये आयोजित बैठकीत उत्पादन शुल्क मंत्री श्री. देसाई बोलत होते. बैठकीस आमदार बालाजी कल्याणकर, बार्टीचे महासंचालक सुनील वारे, सकल मातंग समाजाच्यावतीने मच्छिंद्र सकटे, श्री. वाडेकर, सामाजिक न्याय विभागाचे सहसचिव सोना बागुल आदींसह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच दुरदृश्य संवाद प्रणालीद्वारे सामाजिक न्याय विभागाचे आयुक्त ओमप्रकाश बकोरीया उपस्थित होते. उत्पादन शुल्क मंत्री श्री. देसाई म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती प्रवर्ग आरक्षण उपवर्गीकरण करण्याचा अधिकार राज्यांना दिला आहे. राज्य शासनाच्या अधिकारात याबाबत करता येणारी कार्यवाही, असलेले अधिकार यासंदर्भात कायद्याच्या चौकटीत बसविण्यासाठी न्यायिक समिती स्थापन करण्याची कार्यवाहीबाबत शासन विचार करीत आहे. मातंग समाजाच्या उपवर्गीकरणाबाबत अभ्यास समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा. प्रशासनाच्या सहकार्याने समाजाच्या मागण्या पुर्ण करण्याची कार्यवाही गतीने करण्यात येत आहे.

आर्टीचे कार्यालय सुरू करण्यात आले असून या माध्यमातून समाजाच्या उत्थानासाठी कार्य गतीने करण्यात यावे. अण्णाभाऊ साठे आर्थिक मागास महामंडळाने १५ लक्ष पर्यंत बिनव्याजी कर्ज योजना राबवावी. महामंडळाच्या योजनांची कर्ज प्रकरणे बँकांनी प्राधान्याने मंजूर करण्याबाबत बँकांना सुचीत करावे. लहुजी साळवे अभ्यास आयोगाने दिलेल्या शिफारशी लागू करण्याबाबत सुधारीत आदेश निर्गमीत करण्यात यावे. लहुजी वस्ताद साळवे स्मारकाचे काम पुण्यात सुरू आहे. स्मारकाचे काम दर्जेदार करण्यात यावे, अशा सूचनाही मंत्री श्री. देसाई यांनी दिल्या. मंत्री श्री. देसाई म्हणाले, वाटेगांव (जि. सांगली) येथील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकासाठी जागेचे तातडीने भूसंपादन करण्यात यावे. भूमापनाची कार्यवाही पुर्ण करण्यात यावी. लहुजी वस्ताद साळवे व अण्णाभाऊ साठे स्मारकासाठी निधीची कमतरता नाही.

# माजी आमदार अरविंद चव्हाण विधानसभेच्या निवडणूक रिंगणात?

## अजित पवार यांची घेतली भेट



**जालना । प्रतिनिधी -** अवघ्या काही दिवसावर येऊन ठेपलेल्या विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर जालना विधानसभेसाठी माजी आमदार तथा अजित पवार राष्ट्रवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष अरविंद चव्हाण यांनी जोरदार तयारी केली असून त्यांनी बुधवार दि. १८ सप्टेंबर २०२४ सकाळी ११.३० वाजता राष्ट्रवादी अजित पवार गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांची भेट घेतली. दरम्यान या भेटीत सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती राष्ट्रवादी अजित पवार गटाचे तालुकाध्यक्ष संतोष ढेंगळे यांनी दिली.

जालना विधानसभेची जागा ही राष्ट्रवादी अजित पवार गटाला सुटली पाहिजे यासाठी माजी आमदार अरविंद चव्हाण यांनी जोरदार फिल्डींग लावलीय. त्यासाठी त्यांनी दि. १७ सप्टेंबर २०२४ रोजी रात्री ७.३० वाजता माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांची देखील भेट घेतली असून जालना विधानसभा मतदार संघ हा अजित पवार गटाकडे सोडवून घेण्यासाठी प्रयत्न केलेत.

माजी आमदार अरविंद चव्हाण यांनी जालना विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढविण्यासाठी पुर्ण तयारी केली. त्यासाठी त्यांनी आपल्या पारड्यात टिकीट पाडून घेण्यासाठी मुंबईच्या चकारा वाढल्या आहेत. युवा नेते धैर्यशिल चव्हाण यांच्या नेतृत्वात आज एका शिष्टमंडळाने अजित पवार यांची भेट घेतली असून जालना विधानसभेची जागा राष्ट्रवादीकडे सोडवून घेण्याची मागणी केली. दरम्यान अजित पवार यांनी सकारात्मक चर्चा केली असून अरविंद चव्हाण यांना उमेदवारी निश्चित असल्याचं कार्यकर्त्याकडून सांगण्यात आलंय.

# जालन्यातील राज्यस्तरीय कृषि महोत्सवात लकी ड्रॉ...

## पन्नास रुपयात मिळणार दुचाकी; जबाबदारी कुणाची?

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील डॉ. फ्रेजर बाईज शाळेच्या प्रांगणात भरविण्यात आलेल्या राज्यस्तरीय कृषि प्रदर्शनाचे शुक्रवार (दि २०) रोजी उदघाटन झाले. सकाळी अकरा वाजेची वेळ असतांना उदघाटनासाठी सुमारे तीन तास उपस्थितांना ताटकळत राहावे लागले. अखेर पावणे दोन वाजेच्या दरम्यान उदघाटन झाले. या कृषि महोत्सवात शेतकऱ्यांच्या हिताचे व त्यांच्या उत्पनात वाढ करण्यारे, शेती विषयक माहितीचे अनेक स्टॉल लागलेले आहेत. याव्यतिरिक्त खाद्य पदार्थांचे स्टॉल, दुचाकी व्रिकी स्टॉलही या महोत्सवात दिसून येतात.




या महोत्सवात एन्ट्रीलाच मध्यभागी एक दुचाकीचे प्रदर्शन करत असलेल्या स्टॉल लक्षवेधी ठरत असून या स्टॉलवर दोघे-तीघे हे महोत्सव पाहण्यास आलेल्यांकडुन पन्नास रुपयांची पावती भरून घेत आहेत. या पन्नास रुपयात एका नशीबवान व्यक्तीस दुचाकी मिळणार आहे. विशेष म्हणजे या पावतीवर भव्य राज्यस्तरीय जालना कृषी प्रदर्शन २०२४ चा उल्लेख आहे. पावती देणाऱ्या व्यक्तीस आमच्या प्रतिनिधीने विचारले असता ही हे सर्व आयोजकांचेच असल्याचे त्यांनी सांगितले.

कोणत्याही खरेदी - विक्रीच्या व्यवहारावर हा लकी ड्रॉ आयोजित करण्यात आला नसून रोख पन्नास रुपये घेऊन याचा लकी ड्रॉ होणार आहे. मुळात हा लकी ड्रॉ कोणत्या दिवशी होणार, किती वाजता होणार, कोण काढणार, याबाबतची कोणतीही माहिती येथे उपलब्ध नाही. अशा लकी ड्रॉ साठी जिल्हा पातळीवर कोणत्या परवानग्या लागतात का? याची पुसटशी कल्पना देखील पैसे प्राप्त करणाऱ्या या व्यक्तींना नाही. पावतीवर कुणाचेही नाव नाही त्यामुळे काही गैरव्यवहार झाल्यास कुणाला जबाबदार धरणार... काही विपरित घडल्यास कृषि प्रदर्शनाचे आयोजक याची जबाबदारी घेतील का? हा एक प्रकारे महोत्सवात सहभागी होणाऱ्या, पाहण्यास येणाऱ्या शेतकऱ्यांच्या लुटीचा प्रकार म्हंटल्यास वावगे ठरणार नाही. या सर्व बाबींचा विचार करुन जिल्हाधिकारी यांनी याबाबीकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

# २३ सप्टेंबरला शिकाऊ भरती मेळावा

**जालना । प्रतिनिधी -** जालना येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत सोमवार दि.२३ सप्टेंबर २०२४ रोजी आयटीआय उत्तीर्ण उमेदवारांसाठी प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. तरी आयटीआय उत्तीर्ण उमेदवारांनी मुलाखतीसाठी सकाळी १० वाजता हजर रहावे, असे आवाहन सहा. प्रशिक्षणार्थी सल्लागार, मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# राज्यपाल, मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत आज जुहू बीच येथे 'स्वच्छता मोहीम'

**मुंबई । प्रतिनिधी -** नागरिकांमध्ये सागरी प्रदूषण विषयी जागृती करणे आणि स्वच्छतेचे महत्व पटवून देणे या उद्देशाने आंतरराष्ट्रीय सागरी दिनाच्या निमित्ताने राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. २१ सप्टेंबर, २०२४ रोजी सकाळी ७.00 वाजता जुहू किनाऱ्यावर स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.

केंद्रीय वने, पर्यावरण आणि वातावरणीय बदल मंत्रालय व महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने या स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेमध्ये लोकप्रतिनिधी, विद्यार्थी, युवा संघटना, राष्ट्रीय छात्र सेना, सागरी सुरक्षा दल सहभागी होणार आहेत.

राष्ट्रीय किनारी अभियान योजनेअंतर्गत सर्व १३ किनारी राज्यांमध्ये २१ सप्टेंबर, २०२४ रोजी आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिनानिमित्त समुद्रकिनारा स्वच्छता मोहिम आयोजित करण्यात आली आहे. याअंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. गेल्या ४ वर्षांपासून देशात सागरी किनारा स्वच्छता मोहीम राबवण्यात येत आहे. या दिवशी राज्यातील सागरी किनाऱ्यावरील सर्व जिल्ह्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वतीने सागरी किनारा स्वच्छता मोहीम राबवण्यात येणार आहे.

# मारवाडी संमेलनच्या संभाजीनगर विभाग उपाध्यक्षपदी उमेश पंचारिया

**जालना । प्रतिनिधी** - महाराष्ट्र प्रदेश मारवाडी संमेलनच्या संभाजीनगर विभाग उपाध्यक्षपदी उमेश जुगलकिशोर पंचारिया यांची निवड करण्यात आली आहे.



मारवाडी संमेलनचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष निकेश गुप्ता यांनी ही नियुक्ती केली आहे. उमेश पंचारिया यांनी सन २०२१-२३ मध्ये मारवाडी युवा मंचचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पाडलेली असून, त्यांच्या नेतृत्वात राज्यात राबविण्यात आलेल्या सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य व पर्यावरणपूरक या क्षेत्रातील उल्लेखनीय उपक्रमाची राष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात येऊन देशातील श्रेष्ठ प्रांत म्हणून महाराष्ट्र प्रांताचा गौरव करण्यात आला होता. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन मारवाडी संमेलनचे संभाजी नगर विभाग उपाध्यक्ष म्हणून त्यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. आपल्यातील संघटन कौशल्याद्वारे निश्चितच मराठवाडा पातळीवर संघटन वृद्धिंगत कराल, अशी अपेक्षा प्रदेशाध्यक्ष निकेश गुप्ता यांनी व्यक्त केली आहे.

उमेश पंचारिया यांची संभाजीनगर विभाग उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल वीरेंद्र धोका, सुदेश करवा ,सुभाष देविदान, घनश्यामसेठ गोयल महेश भक्कड़ कमलबाबू झुनझुनवाला, पन्नालाल बगडिया, समीर अग्रवाल, सूर्यनारायण गजबी, डूंगगरसिंग राजपुरोहित, लक्ष्मीनारायण मानधना, सुरेंद्र चेचाणी, विजय जैन, सुरेश मुथा, महावीरजी गेलड़ा, , संजय बाहेती, दिलीप चेचानी, राजेश जैन, रमेशचंद्र अग्रवाल, दिनेश बरलोटा, नंदकिशोर जेथलिया, मनीष तवरावाला, अनिल सोनी, वीरेंद्र रुणवाल, सुनील बियानी, विशाल शर्मा, विजय गिनोडीया, मदनलाल खंडेलवाल, शाम लखोटिया, चेतन बोथरा, जगदीश भारतीया, पीयूष होलानी, उमेश बजाज, संतोष करवा आदींनी अभिनंदन केले आहे.

# महाराष्ट्र शासनाचे ८, १२, १४ व १९ वर्षे मुदतीचे प्रत्येकी १ हजार ५०० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

**मुंबई । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाच्या ८ वर्षे मुदतीच्या १ हजार ५०० कोटींच्या रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकासकामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकान्वये दिली आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) कर्जरोखे रकमेच्या दहा टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र, एका गुंतवणूकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीत जास्त एक टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंतच वाटप करण्यात येईल.

२४ सप्टेंबर २०२४ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् २४ सप्टेंबर २०२४ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.

यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.00 पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान २५ सप्टेंबर २०२४ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/ प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील.

कर्जरोख्याचा कालावधी ८ वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी २५ सप्टेंबर २०२४ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दिनांक २५ सप्टेंबर २०३२ रोजी पूर्ण किमतीने केली जाईल. व्याजाचा दर हा दरसाल दरशेकडा कूपन दरा एवढा असेल. व्याजाचे प्रदान रोख्याच्या मूळ दिनांकापासून मूळ किमतीवर प्रतिवर्षी दिनांक मार्च २५ आणि सप्टेंबर २५ रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल.

शासकीय रोख्यांमधील बँकांची गुंतवणूक ही बँकिंग विनियम अधिनियम १९४९ खालील कलम २४ अंतर्गत सांविधिक रोकड सुलभता गुणोत्तर (ड्डठ) या प्रयोजनार्थ पात्र समजण्यात येईल. हे कर्जरोखे पुनः विक्री-खरेदीसाठी अनुज्ञेय असतील, अशी माहिती वित्त विभागाने दिली आहे.

**महाराष्ट्र शासनाचे १२ वर्षे मुदतीचे १ हजार ५०० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस**

महाराष्ट्र शासनाच्या १२ वर्षे मुदतीच्या १ हजार ५०० कोटींच्या रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकासकामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकान्वये दिली आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) कर्जरोखे रकमेच्या दहा टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र, एका गुंतवणूकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीत जास्त एक टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंतच वाटप करण्यात येईल.

२४ सप्टेंबर २०२४ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् २४ सप्टेंबर २०२४ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.

यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.00 पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान २५ सप्टेंबर २०२४ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/ प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील.

कर्जरोख्याचा कालावधी १२ वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी २५ सप्टेंबर २०२४ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दिनांक २५ सप्टेंबर २०३६ रोजी पूर्ण किमतीने केली जाईल. व्याजाचा दर हा दरसाल दरशेकडा कूपन दरा एवढा असेल. व्याजाचे प्रदान रोख्याच्या मूळ दिनांकापासून मूळ किमतीवर प्रतिवर्षी दिनांक मार्च २५ आणि सप्टेंबर २५ रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल.

शासकीय रोख्यांमधील बँकांची गुंतवणूक ही बँकिंग विनियम अधिनियम १९४९ खालील कलम २४ अंतर्गत सांविधिक रोकड सुलभता गुणोत्तर (ड्डठ) या प्रयोजनार्थ पात्र समजण्यात येईल. हे कर्जरोखे पुनः विक्री-खरेदीसाठी अनुज्ञेय असतील, अशी माहिती वित्त विभागाने दिली आहे.

**महाराष्ट्र शासनाचे १४ वर्षे मुदतीचे १ हजार ५०० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस**

महाराष्ट्र शासनाच्या १४ वर्षे मुदतीच्या १ हजार ५०० कोटींच्या रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकासकामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकान्वये दिली आहे.

स्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) कर्जरोखे रकमेच्या दहा टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र, एका गुंतवणूकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीत जास्त एक टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंतच वाटप करण्यात येईल.

२४ सप्टेंबर २०२४ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् २४ सप्टेंबर २०२४ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.

यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.00 पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान २५ सप्टेंबर २०२४ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/ प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील.

कर्जरोख्याचा कालावधी १४ वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी २५ सप्टेंबर २०२४ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दिनांक २५ सप्टेंबर २०३८ रोजी पूर्ण किमतीने केली जाईल. व्याजाचा दर हा दरसाल दरशेकडा कूपन दरा एवढा असेल. व्याजाचे प्रदान रोख्याच्या मूळ दिनांकापासून मूळ किमतीवर प्रतिवर्षी दिनांक मार्च २५आणि सप्टेंबर २५ रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल.

शासकीय रोख्यांमधील बँकांची गुंतवणूक ही बँकिंग विनियम अधिनियम १९४९ खालील कलम २४ अंतर्गत सांविधिक रोकड सुलभता गुणोत्तर (ड्डठ) या प्रयोजनार्थ पात्र समजण्यात येईल. हे कर्जरोखे पुनः विक्री-खरेदीसाठी अनुज्ञेय असतील, अशी माहिती वित्त विभागाने दिली आहे.

**महाराष्ट्र शासनाचे १९ वर्षे मुदतीचे १ हजार ५०० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस**

महाराष्ट्र शासनाच्या १९ वर्षे मुदतीच्या १ हजार ५०० कोटींच्या रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकासकामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकान्वये दिली आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) कर्जरोखे रकमेच्या दहा टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र, एका गुंतवणूकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीत जास्त एक टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंतच वाटप करण्यात येईल.

२४ सप्टेंबर २०२४ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् २४ सप्टेंबर २०२४ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.

यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.00 पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान २५ सप्टेंबर २०२४ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/ प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील.

कर्जरोख्याचा कालावधी १९ वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी २५ सप्टेंबर २०२४ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दिनांक २५ सप्टेंबर २०४३ रोजी पूर्ण किमतीने केली जाईल. व्याजाचा दर हा दरसाल दरशेकडा कूपन दरा एवढा असेल. व्याजाचे प्रदान रोख्याच्या मूळ दिनांकापासून मूळ किमतीवर प्रतिवर्षी दिनांक मार्च २५ आणि सप्टेंबर २५ रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल.

शासकीय रोख्यांमधील बँकांची गुंतवणूक ही बँकिंग विनियम अधिनियम १९४९ खालील कलम २४ अंतर्गत सांविधिक रोकड सुलभता गुणोत्तर (ड्डठ) या प्रयोजनार्थ पात्र समजण्यात येईल. हे कर्जरोखे पुनः विक्री-खरेदीसाठी अनुज्ञेय असतील, अशी माहिती वित्त विभागाने दिली आहे.

# सीडपार्क प्रमाणे रेशीम पार्कची अवस्था होऊ देऊ नका

## कृषीभूषण विजयअण्णा बोराडे यांचे राजकीय नेत्यांना आवाहन

### राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचे जालन्यात तब्बल तीन तासांच्या प्रतिक्षेनंतर थाटात उदघाटन

**जालना । प्रतिनिधी -** दुष्काळाला प्रतिउत्तर देणारे रेशीम हे पीक आहे, कमी पावसात, गारपीट झाल्यास महत्त्वाचे म्हणजे वर्षातून चार वेळा रेशीम पीकं घेता येते. अर्थाजन देणारे हे पिक आहे त्यामुळे सीडपार्कची जी अवस्था झाली तशी रेशीम पार्कची अवस्था होऊ देऊ नका असे आवाहन राजकीय नेत्यांना उद्देशून कृषीभूषण विजय आण्णा बोराडे यांनी येथे केले. सकाळी अकरा वाजेची उदघाटनाची वेळ असतांना तब्बल तीन तासांच्या प्रतिक्षेनंतर दुपारी सुमारे पावणे दोन वाजेदरम्यान कार्यक्रमाचे थाटात उदघाटन झाले.

येथील डॉ. फ्रेजर बॉईज हायस्कूलच्या मैदानावर आ. कैलास गोरंट्याल यांच्या संकल्पनेतून युवा नेते अक्षय गोरंट्याल व बालाजी मल्टिमीडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आणि अचानकपणे अक्षय गोरंट्याल यांची संकल्पना झालेल्या राज्यस्तरीय जालना कृषी महोत्सव २०२४ चे उदघाटन श्री. बोराडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालना लोकसभेचे नवनिर्वाचित खासदार डॉ. कल्याण काळे हे होते. संयोजक आ. कैलास गोरंट्याल, युवा नेते अक्षय गोरंट्याल, माजी नगराध्यक्ष संगीताताई गोरंट्याल तर प्रमुख पाहुणे म्हणून आ. राजेश राठोड, माजी नगराध्यक्ष बबलू चौधरी, महिको सिडसचे संचालक रितेश मिश्रा, कलश सिडसचे समीर अग्रवाल, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, कृषीभूषण भगवानराव काळे, मदनराव वाढेकर, माजी नगराध्यक्ष राजू परदेशी, उद्योजक नरेंद्र अग्रवाल, महेश सारस्वत, अंकुशराव राऊत, राजेश खडके, सेवानिवृत्त उपअभियंता एस.एन.कुलकर्णी, शीतलताई तनपुरे, सुषमा खरात, चंदाताई भांगडिया, विठ्ठलराव म्हस्के आदींची उपस्थिती होती.

स्टेजवर बसलेल्या ठिकाणी आयोजकांनी विजयअण्णा बोराडे यांना उपस्थितांना संबोधित करण्यासाठी वायरलेस माईक देण्याचा प्रयत्न केला. मात्र, श्री बोराडे यांनी डायसवर येणे पसंत केले व 'अभी तो मै जवान हूं'चा प्रत्ययच जणू आयोजकांना करुन दिला.

पुढे बोलताना श्री बोराडे म्हणाले की, मी अनेक प्रदर्शने, कृषि महोत्सव पाहिले त्यात एखाद्या कृषि अधिकाऱ्यांकडे जबाबदारी दिलेली असते. मत्र, येथे अक्षय गोरंट्याल आणि कैलास गोरंट्याल यांनी हा महोत्सव आयोजित करून त्याचे नियोजन केले ही संकल्पना अफलातून आहे. कैलास गोरंट्याल हे जलसम्राट आहेत तर अक्षय गोरंट्याल आता कृषि सम्राट... अक्षयची एन्ट्री जबरदस्त आहे. कागद न घेता बोलतोय याचे श्रेय श्री बोराडे यांनी सौ. संगीता गोरंट्याल यांना दिले. वेगवेगळ्या विचारधारेच्या लोकांना एकत्र आणणे ही मोठी कसरत आहे ते कार्य आ. गोरंट्याल लिलया पेलतात. जालन्यात २५० पेक्षा अधिक पोटजाती आहेत. याचे नेतृत्त्व आ. कैलास गोरंट्याल करताहेत हे कौतुकास्पद आहे. बद्रीनारायण बारवाले यांचे आणि जालन्याचे मोठे नाते आहे. स्टील सह जालना सीडस साठीही प्रसिद्ध आहे. शासनाने सीडपार्क जाहीर होऊन वेळ झाला तशी अवस्था रेशीम पार्कची होऊ देऊ नका असे आवाहनही त्यांनी उपस्थित राजकीय नेत्यांना उद्देशून केले. रेशीम हे दुष्काळाला प्रतिउत्तर देणारे पीक आहे. ते वर्षातून चार वेळा घेता येते. गारपीट झाली तरी देखील घेता येते रेशिम पीक मोठे अर्थाजन प्राप्त करुन देणारे ठरु शकते, असेही ते यावेळी म्हणाले.

यावेळी रितेश मिश्रा म्हणाले की, बागायती शेतकऱ्यांसाठी आपण काय करु शकतो, यासाठी महिकोच्या वतीने प्रयत्न केले जात आहेत. रेशिम उद्योगाकडे शेतकऱ्यांनी जोडधंदा म्हणून बघितले पाहिजे. आंध्रप्रदेशसह अन्य राज्यांत रेशिमची विक्री वाढली असून, प्रक्रिया उद्योग करण्यावर भर देण्याबाबत अक्षय गोरंट्याल यांनी केलेली सूचना ही अगदी योग्य असल्याचे मिश्रा म्हणाले.

**जालना दिसायला लहान पण देशात महान - खा. डॉ. काळे**

खा. डॉ. कल्याणराव काळे म्हणाले की, इतर देशांतून होणाऱ्या आयात-निर्यातीच्या धोरणांमुळे शेतकरी नडला जातो. आयात-निर्यात होण्याचे काम आपल्या हातात नाही. मत्र, ही पद्धत बंद करण्यासाठी काय करता येईल यासाठी



आपल्याला सामूहिकपणे प्रयत्न करावे लागतील. शेतकऱ्यांच्या पदरात चार पैसे पडले पाहिजे. त्यांच्या शेतमालाला भाव मिळाला पाहिजे, ही भावना अक्षय गोरंट्याल यांनी त्यांच्या प्रास्ताविकात व्यक्त करुन शेतकऱ्यांच्या प्रति असलेला कळवळा आणि जिव्हाळा दाखवून दिला आहे. पद्मभूषण बद्रीनारायण बारवाले यांनी आपल्या महिको कंपनीच्या माध्यमातून जिल्ह्यातीलच नव्हे तर देशातील शेतकऱ्यांना नवनवीन वाणांची आणि तंत्रज्ञानाची ओळख निर्माण करुन देत शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी विशेष प्रयत्न केल्याची आठवण करुन दिली. जालना जिल्ह्याला आणि शेतकऱ्यांना दिशा देण्याचे काम बारवाले यांनी केले आहे. बियाणांची नगरी आणि स्टील सिटी म्हणून जालना प्रसिद्ध असून दिसायला लहान असलेला जालना हा देशात महान असल्याचेही डॉ. काळे यावेळी म्हणाले. अन्य राज्यांत उत्पादित होणारे सफरचंद व स्ट्रॉबेरीचे उत्पादन आपल्या भागात घेण्याच्या दृष्टिने पुढाकार घेत असल्याबद्दल खा. डॉ. काळे यांनी महिको कंपनीचे कौतुक करुन आभार व्यक्त केले. जालन्यातील सिडस पार्कसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आपण अपयशी ठरलो असलो तरी भविष्यात ही वेळ येणार नाही. यासाठी काळजी घेण्याची आवश्यकता असल्याचे ते म्हणाले. अक्षय गोरंट्याल यांनी केलेल्या सुचनांवर विधानसभा निवडणुका झाल्यानंतर नक्की त्या मार्गी लावण्यावर भर देणार असल्याचा विश्वास त्यांनी उपस्थितांना दिला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रास्ताविक करताना युवा नेते अक्षय गोरंट्याल म्हणाले की, विचारांची देवाणघेवाण व्हावी, शेतकरी बांधवांना नवीन तंत्रज्ञानाची ओळख व्हावी या उद्देशाने राज्यस्तरीय कृषीमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि औजारांचा वापर करुन शेतकरी समृद्ध झाला पाहिजे. देशाची अर्थव्यवस्था शेतकरी बांधवांच्या खांद्यावर उभी असून, त्यांचे खांदे मजबूत केले तरच देशाची अर्थव्यवस्था मजबूत होणार आहे. जालन्यातील मोसंबीला जीआय नामांकन प्राप्त झाले असले तरी त्यांची मार्केटिंग करण्यात आपण कमी पडलो असल्याचे स्पष्ट करत ऊस, मोसंबी यावर प्रक्रिया उद्योग उभारले जावेत. कोरडा आणि ओल्या दुष्काळामुळे शेती व्यवसाय कोलमडला याबाबत गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली असल्याचे ते म्हणाले.

## शेती व्यवसाय वाढीसाठी प्रयत्नांची गरज : आ. कैलास गोरंट्याल

महाराष्ट्र राज्यात शेती व्यवसाय वाढीसाठी प्रामाणिक प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे. आपल्या भाषणात आ. कैलास गोरंट्याल यांनी तेलंगाणा मधील निजामबादजवळ असलेल्या अंकापूरम गावातील शेतकऱ्यांविषयीचा अनुभव कथन केला. या गावात प्रत्येक कुटुंबाला पाच एकर शेतजमीन असून, वर्षातून तीन पीक घेत त्यातून वर्षाकाळी प्रति कुटुंबाला एक कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते. गावात सिमेंट रस्ते, मुबलक पाणी, वीज मिळत असल्यामुळे शेतकरी पूर्णतः आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाला असून, चार ते पाच शेतकऱ्यांचे मिळून स्वतःचे कोल्ड स्टोरेज आहे. विशेष बाब म्हणजे गावात कोणताही वादविवाद किंवा तंटा कधीच होत नाही. त्यामुळे या गावातील लोकांना पोलीस स्टेशनची पायरीदेखील आजपर्यंत चढावी लागली नाही, हे विशेष. आपल्या महाराष्ट्रात राज्यातदेखील त्यादृष्टीने प्रयत्न झाले तर शेतकरी बांधव आर्थिकदृष्ट्या संपन्न झाल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास आ. गोरंट्याल यांनी व्यक्त केला.

युवा आदर्श

### सकस आहार ...

आश्रम शाळेत बुवा
देतो आहार सकस
माहीत नाही कसले
काय लावले निकष
चतुरस्त्र पौष्टीक घास
देतो म्हणाला सरस
थाळीत विजोड अन्न
सगळा झाला निरस
स्वस्तात मस्त थाळी
असते भलते साहस
जमाखर्च ताळेबंदात
असते थरारक सर्कस
बीले सगळी प्रलंबित
कळेना काय आकस
कट देऊ किती कुणा
अधिकारी नेते नर्व्हस
तक्रार ऐकाया बहिरे
कसे करायचे धाडस
हिशेब तपासे आंधळे
काय करणारं पाडस
ऐकावे तितुके नवल
कहाण्या समग्र सुरस
धान्य गोदामे रिकामी
तुडुंब भरला सोमरस
समदुःखी एकसमान
गायला लागा कोरस
देणार आहार सकस
ढकलला जाई दिवस

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

**झाडे लावा**
**झाडे जगवा**




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.